# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 29/02/2020 (शनिवार)
# (दुपार)

---

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 8 कि. मी. अंतरावर मौजा खडगाव येथे दिनांक 21/02/2020 चे 07.45 वा. दरम्यान राजु पंढरी क्षिरसागर, वय 25 वर्ष, रा. खडगाव हा राहत्या घरी आंघोळी करीता चुलीवरील गरम पाण्याचा हंडा उचलुन बाथरूम कडे जात असतांना अचानक त्याला फिट आल्याने हातातील गरम पाण्याचा हंडा पडला. त्यामुळे राजु क्षिरसागर हा चुलीजवळ पडल्याने त्याच्या दोन्ही पाय व पाठ जळाल्याने उपचारा करीता मेयो हॉस्पीटल नागपूर येथे भरती केले असता उपचारादरम्यान दि. 25/2/20 चे 06.00 वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक राजुन्द्र मेश्राम, मेयो पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार प्रकाश 9823324826 हे करीत आहे.

## सर्पदंशामुळे मृत्यू

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 20 कि. मी. अंतरावर मौजा चांपा येथे दिनांक 18/02/2020 चे 14.30 वा. दरम्यान सौ. योगिता दिलीप थोटे, वय 45 वर्ष, रा. वाकी, ता. सावनेर या शेतात कापुस वेचण्याकरीता गेल्या होत्या. दरम्यान अचानक त्यांचे उजवा पाय सापावर पडल्याने सापाने पायाचे पोटरीवर चावा घेतला. त्यांना उपचाराकामी प्रथम सरकारी दवाखाना पाटणसावंगी व नंतर मेयो हॉस्पीटल नागपुर येथे रेफर केल्याने दि. 21/02/2020 चे 20.30 वा. उपचारा दरम्यान डॉक्टरने तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक राजुन्द्र मेश्राम, मेयो पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार कुष्णा जुनघरे 9284890174 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर